**पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग**

**ई-निविदा सूचना क्रमांक 01 सन 2018-19**

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरीय कृषी व पशुपक्षी प्रदर्शन सन 2018 हे दिनांक 07 डिसेंबर 2018 ते दिनांक 11 डिसेंबर 2018 या 5 दिवसांच्या कालावधीत कुडाळ जि.सिंधुदुर्ग येथील नवीन एस्.टी.बसआगाराच्या मुंबई गोवा या राष्ट्रीय महामार्गालगतच्या मोकळया मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे. हे प्रदर्शन भरविणेसाठी आवश्यक असणारा सर्व सुविधायुक्त सभामंडप, आकर्षक प्रवेशद्वार, स्वागत कमानी, विविध प्रकारची सुविधायुक्त दालने, बैठक व्यवस्था व सजावट, स्टॉल्सधारकांकरिता मंडप, अखंडीत विदयूत पुरवठयाकरिता विदयूत जन्नीत्रासह (जनरेटर) तात्पुरते विद्युतीकरण, (MSEDCL कडून घेण्यात येणारी जोडणी व वीज पुरवठा वगळता), पाण्याच्या टाक्या, स्वच्छतागृहे व स्वच्छतेच्या सुविधेसाठी कचराकुंडया, जनावरांना बांधावयाकरीताचा मंडप उभारणे तसेच जनावरांतील विविध स्पर्धांकरिता परिक्षण रिंगण इत्यादी अनुषंगिक कामे व विविध प्रकारच्या सेवा व सुविधा पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर उपलब्ध करुन द्यावयाची आहेत. निविदाधारक यांनी करावयाच्या कामाचे सादरीकरण (प्रेझेंटेशन) करणे गरजेचे आहे. तसेच त्यांनी यापूर्वी अशाप्रकारचे कृषि व पशुपक्षी प्रदर्शनाचे इव्हेन्ट मॅनेजमेंटचे काम केलेले असावे. सदर कामाची निविदा ई-टेंडरींग पध्दतीने शासनाच्या **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर मागविणेत येत आहे.

याबाबतचा सविस्तर तपशिल, अटी व शर्ती, निविदा फॉर्म वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा भरणेची मुदत दिनांक - 05/11/2018 ते दिनांक-22/11/2018 रोजी 15.00 पर्यंत राहील. ई-टेंडर पध्दतीने निविदाकारांनी सादर झालेल्या निविदा कागदपत्रांची पुर्तता केल्याची तपासणी करुन दिनांक - 26 नोव्हेंबर 2018 रोजी 15.00 वाजता संग्राम कक्ष, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग कार्यालय येथे उपस्थित निविदाधारकांच्या अगर त्यांच्या प्रतिनिधी समक्ष संकेतस्थळावर उघडण्यात येतील.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**जिल्हा परिषद सिंधुदर्ग,**

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद सिंधुदर्ग,**

जा.क्र.सिंजिप/पसंवि/तां/प्रदर्शन/निविदा सूचना/ 695 /20185
पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी. दिनांक - 03 नोव्हेंबर 2018